# शासकीय तंत्रनिकेतन जालना

जालना-औरंगाबाद रोड, नागेवाडी, जालना जि. जालना
Ph No. 02482 - 299099, 282323
E Mail : principal.gpjalna@dtemaharashtra.gov.in
Web Address: www.gpjalna.ac.in

DTE CODE – 2014 AICTE ID: 1-804497011 MSBTE CODE - 0120


जा.क्र.शातजा/भांडार/२०२४/2439 दिनांक :- 25 SEP 2024

## निविदा दरपत्रक

प्रति,

-------------------,
-------------------.

विषय :- संस्थेतील विद्यार्थी व अधिकारी कर्मचारी यांना नवीन ओळखपत्र तयार करून मिळण्याबाबत.
संदर्भ :- कार्यालयीन आदेश क.जा.कं.शातंजा/आस्था-२/२०२४/२४१४. दि.२१/०९/२०२४.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार आपणास कळविण्यात येते की, या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता संस्थेतील सर्व शाखामध्ये शिक्षण घेत असलेल्या जवळपास जवळपास अंदाजे ६०० ते ७०० विद्यार्थी व अधिकारी कर्मचारी यांना नवीन ओळखपत्र **संस्थेच्या लोगो व नावासहीत** सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे तयार करून मिळण्यासाठी आपणाकडुन **दि.१५/१०/२०२४ च्या आत दोन लिफाफा पध्दतीनुसार सीलबंद निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहे.**

**तांत्रीक लिफाफा क्र.१** मध्ये पुरवठादाराने कंपनीचे /संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी.प्रमाणपत्र, या सर्वांची छायांकीत प्रत जोडावी.

**वाणीज्यीक लिफाफा क्र.२** मध्ये पुरवठादाराने स्वतःच्या लेटरहेडवर खालील विवरणाप्रमाणे दरपत्रक स्वाक्षरीसह सादर करावे.

| अ.क्र. | विवरण | किंमत प्रती नग |
|---|---|---|
| ०१ | **विद्यार्थी ओळखपत्र तयार करणे** :- १. ओळखपत्र पी.व्ही.सी. कार्ड वर छपाई करणे २. कार्ड होल्डर देणे ३. संस्थेचा लोगो व नाव असलेली लेस देणे. | |
| ०२ | **अधिकारी कर्मचारी ओळखपत्र तयार करणे** :- १. ओळखपत्र पी.व्ही.सी. कार्ड वर छपाई करणे २. कार्ड होल्डर देणे ३. महाराष्ट्र शासन नाव व लोगो असलेली लेस देणे. | |

अटी व शर्ती :-

१. निविदा स्विकारल्या नंतर सदरील काम १० ते १५ दिवसात पुर्ण करावे लागेल.
२. सदरील काम विहीत कालमर्यादीत पुर्ण न केल्यास निविदेच्या देय रक्कमेतून प्राचार्यांच्या अंतिम निर्णयानुसार ठराविक रक्कम वजा करण्यात येईल
३. सदरील कामासाठी कोणतीही आगाऊ रक्कम देय राहणार नाही.

सोबत :- ओळखपत्र नमुना

(डॉ.निनाद रामभाऊ जावडे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन जालना.

प्रत :- १. या संस्थेच्या मुख्य नोटीस बोर्ड साठी.
२. या संस्थेच्या प्रोग्रामर यांना Website वर upload करण्याकरीता.